# किटकनाषके खरेदी करतांना आणि वापरतांना काय करावे व काय करू नयें













## कीटकनाषके खरेदी करताना आणि वापरताना काय करावे व काय करू नये .

| काय करावे | काय करू नये |
|---|---|
| **खरेदी करताना** | |
| ➢ कीटकनाषके किवा जैविक कीटकनाषके फक्त अधिकृत विक्रेते जांच्याकडे वैध प्रमाणपत्र आहे त्यांच्याकडुनच खरेदी करावे .<br>➢ ठरवलेल्या क्षेत्रफळसाठी एका वेळेला आवश्यक असेल तेवढेच कीटकनाषके खरेदी करावे .<br>➢ कीटकनाशकांचा पाकिटावरील मंजूर लेबल तपासून पाहावे.<br>➢ लेबलवरील बॅच क्रमांक,नोंदणी क्रमांक,उत्पादन तारीख,समाप्ती तारीख तपासून पहावी.<br>➢ कीटकनाषके विकत घेताना बंद पाकिटातील कीटकनाशकेच खरेदी करावे. | ➢ विना परवाना विक्रेत्यांकडून व रस्त्यावरील विक्रेत्यांकडून कीटकनाशके खरेदी करु नये.<br>➢ संपूर्ण हंगामा साठी एकाच वेळी कीटकनाशके खरेदी करु नये.<br>➢ अधिकृत शिक्का असलेल्या लेबल शिवाय कीटकनाशकाचा डबा अथवा बाटली खरेदी करु नये.<br>➢ डब्यावरील तारीख संपलेले कीटकनाशक खरेदी करु नये.<br>➢ झाकण सैल असलेले किंवा डबा / बाटली गळत असलेले अथवा सील नसलेले कीटकनाशक खरेदी करु नये . |
| **साठवून ठेवताना** | |
| ➢ कीटकनाषके घरचा आवरपासून दूर साठवून ठेवावे.<br>➢ कीटकनाषके त्यांचा मूळ पाकिटातच ठेवावे .<br>➢ कीटकनाषके व तननाशके स्वतंत्रपणे साठवून ठेवावे.<br>➢ जिथे कीटकनाषके संग्रहीत केले आहे,ते ठिकाण चिन्हाचा आधारे धोका असे दाखवावे .<br>➢ कीटकनाषके लहान मुलांपासून दूर संग्रहीत करावे.<br>➢ कीटकनाशकांचे संग्रहालय थेट सूर्यप्रकाश व पावसापासून सुरक्षित असावे. | ➢ कीटकनाशके घराच्या आवारात ठेवू नये.<br>➢ कीटकनाशके त्याच्या मूळच्या डब्यातून काढून दुस-या डब्यात ठेवू नये.<br>➢ कीटकनाशके आणि तणनाशके सोबत साठवू नये.<br>➢ कीटकनाशके लहान मुलां पासून लांब ठेवावे.<br>➢ कीटकनाशके साठवलेल्या ठिकाणी धोक्याची सूचना दर्शविणारे चिन्ह लिहिण्यास विसरु नये.<br>➢ कीटकनाशकाचे डबा/ बाटल्या पावसात व सूर्यप्रकाशात उघडे ठेवू नये. |
| **हाताळताना** | |
| ➢ कीटकनाशके वाहतुकीच्या दरम्यान वेगळे ठेवावे .<br>➢ कीटकनाषके संग्रहलयातून काळजी पूर्वक जिथे वापरायचे आहे तिथे न्यावे . | ➢ कीटकनाशकांची वाहतुक खाण्यापिण्याच्या वस्तुबरोबर करु नये / या दोन्ही वस्तु एकत्र ठेवू नये.<br>➢ कीटकनाशके डोक्यावर, खांद्यावर अथवा पाठीवर ठेवूने वाहतुक करु नये. |
| **फवारणीचे द्रावण तयार करतांना** | |
| ➢ द्रावण तयार करतांना नेहमी स्वच्छ पाणी वपरावे.<br>➢ फवारणीचे द्रावण तयार करतांना सुरक्षित कपडे उदा.हातमोजे ,मास्क ,टोपी , अप्रोन. पैजामा असे पूर्ण शरीर झाकणारे कपडे वापरावे.<br>➢ द्रावण तयार करतांना नाक ,डोळे ,कान व हाताचे संरक्षण करावे.<br>➢ द्रावण तयार करण्यापूर्वी कीटकनाशकाच्या डब्यावरील सूचना काळजीपूर्वक वाचाव्या.<br>➢ गरज असेन तेवढेच द्रावण तयार करावे.<br>➢ दाणेदार कीटकनाशके आहे तसेच वापरावे.<br>➢ फवारणीची टाकी भरतांना द्रावणाची गळती होऊ नये याची काळजी घ्यावी. | ➢ जमा झालेले किवा गढूळ पाणी वापरू नये .<br>➢ सुरक्षित कपडे घातल्या शिवाय फवारणीचे द्रावण तयार करू नये.<br>➢ कीटकनाशके व द्रावण शरीराच्या कुठल्याही भागावर पडू देवू नये.<br>➢ कीटकनाशके वापरण्यापूर्वी डब्यावरील /बाटली वरील सूचना वाचण्यास टाळाटाळ करू नये.<br>➢ एकदा तयार केलेले द्रावण,उरले असल्यास ,२४ तासापर्यंतच वापरावे ,त्यानंतर वापरू नये.<br>➢ दाणेदार कीटकनाशके कधीही पाण्याबरोबर मिसळू नये.<br>➢ फवारणीच्या टाकीचा वास घेऊ नये. |

| | |
|---|---|
| ➢ नेहमी कीटक नाशकाचा शिफारस केलेली मात्रा (प्रमाण) वापरावी .<br>➢ तुमच्या आरोग्यावर परिणाम होईन अशी कुठलीही क्रिया टाळावी. | ➢ फवारणीसाठी शिफारस केलेल्या प्रमानापेक्ष्या जास्त प्रमाण वापरू नये.असे केल्यास झाडांना व निसर्गाला धोका संभवतो.<br>➢ कीटकनाशकांचा वापर करताना खाणे,पिणे,चघळणे, धुम्रपान करू नये. |
| उपकरणे निवडतांना | |
| ➢ उपकरणे योग्य प्रकारची निवडावी.<br>➢ योग्य आकाराच्या नोझल निवडावी .<br>➢ कीटकनाषके आणि तननाशका करिता वेगवेगळे फवारणी यंत्र वापरावे. | ➢ फवारणी साठी गळणारे किंवा नादुरुस्त साधने वापरु नये.<br>➢ निरुपयोगी व नादुरुस्त नोझल वापरु नये, तसेच नोझल स्वच्छ करण्यासाठी तोंडाचा वापर करु नये त्या ऐवजी निकामी टूथ ब्रश वापरावा.<br>➢ तणनाशके आणि कीटकनाशका करिता एकच फवारणी यंत्र वापरु नये. |
| द्रावणाची फवारणी करतांना | |
| ➢ पाकिटावर शिफारस केलेल्या प्रमानाचाच वापर करावा.<br>➢ फवारणी थंड आणि शांत हवेच्या दिवशीच आयोजित करावी.<br>➢ प्रत्येक फवारणीत द्रावण टाकताना शिफारस केलेले प्रमाण वापरावे.<br>➢ हवेच्या दिशेणेच फवारणी करावी.<br>➢ फवारणी केल्यानंतर फवारणी यंत्र व फवारणी करीता वापरलेल्या बाटल्या डिटर्जंट / साबण वापरून पाण्याने स्वच्छ कराव्या.<br>➢ फवारणी केल्यानंतर लगेच शेतात प्राण्यांचे/ कामगारांचे येणे टाळावे. | ➢ शिफारसीपेक्षा जास्त मात्रेत द्रावण फवारु नये.<br>➢ कडक उन्हाच्या किंवा वादळी दिवसात फवारणी करु नये.<br>➢ पाणी पडायच्या पहिले किंवा पडल्यानंतर लगेच फवारणी करु नये<br>➢ हवेच्या विरुध्द दिशेने फवारणी करु नये.<br>➢ कीटकनाशके कालवण्यासाठी वापरलेलेल भांडे / बाटल्या धूतल्यानंतरही घरगुती कामाकरिता वापरु नये.<br>➢ फवारणी केल्यानंतर लगेचच कुणीही सुरक्षित कपडे घातल्याशिवाय शेतात जावू नये. |
| फवारणी केल्यानंतर | |
| ➢ उरलेल्या फवारनीच्या द्रावनाचा निचरा सुरक्षित/एककि जागेवर करावा.<br>➢ फवारनीसाठी वपरलेल्या बाटल्या व भांडयाचा दगडाने/काडीने तोडून जमीनीत,पान्याच्या स्त्रोतापासुन दूर निचरा करावा.<br>➢ फवारनी केल्यावर हात व चेहरासाबनाने स्वछ धुतल्यानंतर जेवन / धुम्रपान करावे .<br>➢ फवरानी केल्यानंतर काही घातक लक्षने आढ्ळल्यास,लगेच डॉक्टराना दखवून प्रथोमपचार करावा.किटकनशकाचा रीकामा डबाही डॉक्टराना दाखवावा. | ➢ उरलेले फवारणीचे द्रावण विहिरेत, तलावार किंवा पाण्याच्या स्त्रोतात टाकू नये.<br>➢ कीटकनाशकाचे रिकामे भांडे / बाटल्या पुन्हा दुसरे काही साठवण्या करीता वापरु नये.<br>➢ फवारणीनंतर स्नान करुन कपडे बदलल्याशिवाय काहीही खावू नये तसेच धूम्रपान करु नये.<br>➢ फवारणी नंतर काही लक्षणे आढळल्यास डॉक्टराना दाखविण्यात टाळाटाळ करु नये. असे केल्यास पेशंटच्या जीवला धोका संभवतो. |

**घातक कचऱ्यावरील पर्यावरणीय माहिती प्रणाली**

**सीएसआईआर-राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्थान, नेहरू मार्ग ,नागपूर**









